# मार्गदर्शनपर व्याख्यान : ‘प्रेमात पडतांना...’

## अहवाल

मंगळवार दि. २२ जुलै, २०२५ रोजी महाविद्यालयाच्या अंतर्गत गुणवत्ता निर्धारण कक्ष, महिला विकास कक्ष आणि महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, शहापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ‘प्रेमात पडतांना…’ या विषयावर मार्गदर्शनपर व्याख्यानाचे यशस्वीपणे आयोजन करण्यात आले. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे मानसिक व भावनिक सक्षमीकरण करणे या उद्देशाने व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. सदर मार्गदर्शनपर व्याख्यान हे ज्ञानवर्धिनी संस्थेच्या विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष श्री. किशोर कुडव, विश्वस्त मंडळाचे सचिव श्री. रमेश वनारसे, महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, ठाणे जिल्हा कार्याध्यक्ष डॉ. सुषमा बसवंत, कार्यकारी समितीच्या सदस्य श्रीमती. अपर्णाताई खाडे आणि कार्यकारी समितीचे सदस्य श्री. बाळासाहेब खारीक यांच्या विशेष उपस्थितीत पार पडले. या प्रसंगी प्रमुख वक्त्या म्हणून डॉ. सुषमा बसवंत उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान कार्यकारी समितीच्या सदस्य श्रीमती अपर्णाताई खाडे यांनी भूषविले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक महिला विकास कक्ष समन्वयक डॉ. सीमा परटोले यांनी केले.

विश्वस्त मंडळाचे सचिव श्री. रमेश वनारसे यांनी अंधश्रध्दा निर्मूलन समितीच्या कार्याबाबत मार्गदर्शन करून विद्यार्थ्यांना अं.नि.स. मध्ये सहभागी होण्याचे आवाहन केले. विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष श्री. किशोर कुडव यांनी प्रेम म्हणजे काय ? या स्वरचित कवितेचे वाचन करुन विद्यार्थ्यांना प्रेम या संकल्पनेबाबत मार्गदर्शन केले.

प्रमुख वक्त्या डॉ. सुषमा बसवंत यांनी विद्यार्थ्यांना, प्रेम म्हणजे नेमकं काय आकर्षण की बांधिलकी?, तरुण वयात प्रेम गरज की मोह ?, सोशल मीडियाच्या युगात प्रेमाचं बदलतं रूप, प्रेमातील धोके : ब्लॅकमेल, जबरदस्ती व भावनिक खेळ, आत्मसन्मानाचे भान आणि नकार स्वीकारण्याची मानसिक तयारी इ. प्रेमाशी संबंधित विविध पैलूंवर सखोल मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षा व कार्यकारी समितीच्या सदस्य अपर्णाताई खाडे यांनी अध्यक्षीय भाषणात प्रेम संकल्पनेची व्यापकता, समाजात घडणाऱ्या विविध घटनांची उदाहरणे देवून विद्यार्थ्यांनी अभ्यासावर प्रेम करावे असे सांगितले. सदर व्याख्यानास महाविद्यालयातील १२२ विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महिला विकास कक्षाच्या सदस्य डॉ. अश्विनी ओव्हाळ यांनी केले. तर आभार प्रदर्शन विशाखा फोरम सदस्य कु. पायल बोंद्रे हिने केले. सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. अनिलकुमार सिंह, उपप्राचार्य डॉ. संतोष गायकवाड, IQAC समन्वयक प्रो. डॉ. शहाजी वाघमोडे, महिला विकास कक्षाच्या समन्वयक डॉ. सीमा परटोले, महिला विकास कक्षाच्या सदस्य प्रा. सरला कातकाडे, प्रा. नयना जाधव, शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी विशेष सहकार्य केले. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीत गायनाने झाली.